जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - ३०३ दिनांक -०२/०५/२०२१**

**खंडणी विरोधी पथक.१ गुन्हे शाखा पुणे**

**रेंमडिसिवर इंजेक्शनचा काळाबाजार करणा-यांना**

खंडणी विरोधी पथक-१ गुन्हे शाखा पुणे शहर यांनी ठोकल्या बेडया

**मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.अमिताभ गुप्ता यांनी पोलीस आयुक्त पुणे शहर म्हणून पदभार स्विकारल्यानंतर शहरातील पुणे शहरातील टोळी गुन्हेगार, बेकायदेशिर धंदे करणारे,अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट चालविणारे, लोकांमध्ये दहशत करणारे सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करुन त्यांचे समूळ उच्चाटन करणे तसेच सध्या चालु असलेल्या कोविड-१९ महामारीच्या काळात रेमडिसिव्हीर इंजेक्शनचा सारख्या वस्तुंचा काळाबाजार करणारे लोकांवर कडक कारवाई करण्याबाबत आदेश सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना दिले आहेत.**

दिलेल्या आदेशानुसार दि.०१/०५/२०२१ रोजी खंडणी विरोधी पथक .१ कडील सपोनि संदिप बुवा व स्टाफ असे पुणे शहरात बेकायदेशीरपणे रेंमडिसिवर इंजेक्शनची विक्री बाबत माहिती घेत असताना भारती विदयापीठ पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात पेट्रोलिंग करित आले असताना खंडणी विरोधी पथक-१ कडील पोलीस नाईक राजेंद्र लांडगे व पोलीस शिपाई विवेक जाधव यांना त्यांचे बातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की एक महिला तिचे साथीदारांसह भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत रेंमडिसीवर इंजेक्शन ची ब्लॅक ने एक इंजेक्शन ३७,०००/- रु किंमतीला विकत आहेत.सदर बातमीची खातरजमा करुन एक बातमीदारा यास डमी गि-हाईक बनवुन पाठविले असता खालील नमुद इसम नामे १) निखील बाबुराव जाधव वय.२४ वर्षे, रा.आंबेगाव पठार पुणे २) मयुर विजय चव्हाण वय.२२ वर्षे, रा. वराळे तळेगाव दाभाडे पुणे यांनी १,०,५,०००/- रुपयांना ३ रेमडिसिवर इंजेक्शन देण्याचे कबुल केले त्याप्रमाणे विक्रीस घेऊन आलेले ०३ रेंमडिसिवर इंजेक्शन व त्यांनी सोबत आणलेली होंडा डब्लु.आर.व्ही.ही चार चाकी कार नं एमएच/१२/एचक्यु/ ५४३५ सह सापळा लावुन २१.२५ वा स्टोनेक्स गॅलरी शो-रुम समोर , नवले ब्रिज ते कात्रज चौक जाणारे रोडचे डावे बाजुस ताब्यात घेतले, त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी त्यांची सहकारी एक महिला हिने नमुद इंजेक्शन हे विक्री करिता दिले असल्याचे सांगत आहे.

गुन्हयात १) ८,४००/- रु किंमतीचे ०३ रेंमडिसिवर इंजेक्शन,२) एक रेड.मी कंपनीचा मोबाईल ३) एक ॲपल कंपनीचा १२ प्रो मोबाईल व गुन्हयात वापरलेली होंडा डब्लु.आर.व्ही कार नंबर एमएच /१२/एचक्यु/५४३५ असा एकुण ८,१८,,४००/- किं चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर प्रकरणी ३ आरोपींविरुध्द भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे औषध निरीक्षक,सुहास तानाजी सावंत यांनी फिर्याद दिली असुन त्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त,श्री.अशोक मोराळे,गुन्हे शाखा पुणे शहर, मा.पोलीस उपायुक्त, श्री श्रीनिवास घाडगे,गुन्हे शाखा पुणे शहर, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,श्री.सुरेंद्रकुमार देशमुख,गुन्हे.१,पुणे शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विठ्ठल पाटील,खंडणी विरोधी पथक.१ गुन्हे शाखा पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरिक्षक संदिप बुवा, पो.हवा.मधुकर तुपसौंदर पोलीस नाईक, राजेंद्र लांडगे, पोलीस नाईक, नितीन कांबळे, पो.शि. विवेक जाधव, पो.शि.अमर पवार यांनी केलेली आहे.